## थोडक्यात

### बारावीत नापास झाल्याने विद्यार्थ्याची आत्महत्या

■ **संगमनेर :** बारावीमध्ये नापास झाल्याने आलेल्या नैराश्येतून एका विद्यार्थ्याने शेततळ्यात उडी मारुन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना अहमदनगर जिल्ह्यात संगमनेर तालुक्यातील नांदुरी दुमाला येथे मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली. सौरभ बाळासाहेब लांडगे (१८) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. बारावीचा निकाल मंगळवारी दुपारी एक वाजता ऑनलाईन जाहीर झाला. नांदुरी येथील सौरभ लांडगे याने बारावीची परीक्षा दिली होती.

### लाचखोर आरोग्य अधिकाऱ्याला रंगेहाथ पकडले

■ **पुणे :** आरोग्य सेविकेची आंतरजिल्हा बदली करण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेतील आरोग्य अधिकाऱ्याने ८० हजार रूपये लाचेची मागणी केली. तडजोडीअंती २० हजार रूपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्याला रंगेहाथ पकडले. जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागात मंगळवारी सायंकाळी ही कारवाई करण्यात आली. दिलीप काशीनाथ माने असे लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे. बंडगार्डन पोलीस ठाण्यात त्यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# मनपाच्या शिक्षण विभागाकडे अँन्टी रॅगिंग स्कॉड नाही

■ डीएड महाविद्यालायतही रॅगिंगच्या घटना घडल्याची शिक्षण विभागाला भिती

■ **प्रतिनिधी**
मुंबई

मुंबई महापालिकेच्या नायर रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टरांकडून होणारा जातीवाचक त्रास आणि रॅगिंगला कंटाळून डॉ. पायल यांनी आत्महत्या केली. अशा घटना होऊ नये म्हणून पालिकेकडे अँटी रॅगिंग स्कॉड नसल्याचे उघड झाले आहे. पालिकेच्या शिक्षण विभागाच्या बैठकीत ही बाब उघड झाली आहे. त्यामुळे अँटी रॅगिंग स्कॉड त्वरित बनवले जावे, अशी मागणी भाजपाच्या शिक्षण समिती सदस्य आरती पुगावकर यांनी केली आहे.

भाजपाच्या शिक्षण समिती सदस्य आरती पुगावकर रॅगिंगसारखे प्रकार मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या डीएड महाविद्यालायतही घडू शकतात, अशी भीती आरती पुगावकर यांनी शिक्षण समितीच्या बैठकीत व्यक्त केली आहे. डीएड महाविद्यालयांमध्ये मोठ्या संख्येने महिला शिक्षण घेतात. या महिलांवर पायल सारखी आत्महत्येची वेळ येऊ नये म्हणून अँटी रॅगिंग स्कॉड आहे का? अशी विचारणा पुगावकर यांनी केली. यावर प्रशासनाकडे कोणतेच उत्तर नसल्याने यावर पुढील बैठकीत माहिती सादर केली जाईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. डॉ. पायलच्या आत्महत्येची पुनरावृत्ती डीएड महाविद्यालयामध्ये होऊ नये म्हणून अँटी रॅगिंग स्कॉड स्थापन करावे, अशी मागणी पुगावकर यांनी केली आहे.नायर रुग्णालयामधील टोपीवाला वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉ. पायल तडवी यांना (वय २३) स्त्रीरोगतज्ञ व्हायचे होते. शिक्षण घेताना तिला वरिष्ठ सहकाऱ्यांकडून जातीवाचक आणि रॅगिंगचा त्रास सहन करावा लागत होता. याबाबतची तक्रार पायल यांच्या आईने नायर रुग्णालयाच्या अधिष्ठात्याकडे केली होती. त्यानंतरही त्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याने पायल यांनी आत्महत्या केली होती. पायल यांच्या आत्महत्येनंतर मुंबई सारख्या जागतिक दर्जाच्या शहरात जातीवादावरून आत्महत्या करावी लागल्याने राज्यात आणि देशभरात याचे पडसाद उमटले आहेत.

# वसईत कलाकारांच्या शूटिंग लूकमुळे सुरक्षारक्षक घाबरला

■ दहशतवादी घुसल्याची चर्चा

■ **प्रतिनिधी**
वसई

वसईत दहशतवादी घुसल्याच्या माहितीमुळे सध्या पालघर जिल्ह्यात भितीचे वातावरण पसरलं आहे. मात्र ते दहशतवादी नसून सिनेमाचे कलाकार असल्याची पालघर पोलिसांनी खात्री केली आहे. यामुळे पालघरमधील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

वसई पश्चिमेकडील भारत बँकेच्या सुरक्षा रक्षकाला सोमवारी २७ एप्रिलला दुपारी ३ च्या सुमारास एक व्यक्ती हत्यार घेऊन वावरत असल्याचं दिसलं. या व्यक्तीच्या दिसण्यावरुन आणि हालचालीवरुन तो आतंकवादी असल्याचा सुरक्षा रक्षकाला संशय आला. यानंतर त्याने तात्काळ पोलीस कंट्रोल रुमला फोन केला. पोलिसांना त्या सुरक्षा रक्षकाने पालघरमध्ये दहशतवादी घुसल्याची माहिती दिली.

सुरक्षा रक्षकाने केलेल्या वर्णनावरून पालघर पोलिसांनी सदर व्यक्तीचा तपास सुरु केला. पोलिसांनी तपासाला सुरुवात केल्यानंतर त्यांनी हा व्यक्ती दिसलेल्या परिसरात सीसीटिव्हीची तपासणी सुरु केली. तपासणी करत असतानाच वसई पश्चिमेकडील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातील हॉटेलमधील सीसीटीव्ही तपासले. यावेळी हा व्यक्ती एका वाहनामध्ये बसून पुढे गेल्याचे पोलिसांना समजले.

पोलिसांनी तात्काळ गाडीचा नंबर घेत शहरात नाकाबंदी लागू केली. नाकाबंदीत हा तरुण तात्काळ पकडला गेला. मात्र त्यावेळी हा तरुण आतंकवादी नसून सिनेमात काम करणारा असल्याचं निष्पन्न झाले.

**DHANLAXMI COTEX LIMITED**
Regd. Off. : 285,Princess Street, Chaturbhuj Jivandas House, 2nd Floor, Mumbai - 400 002.
CIN: L51100MH1987PLC042280
Extract of Standalone Annual Audited Financial Results for the quarter and year ended 31st March 2019
BSE Code: 512485 (Rs. in Lakhs)

| Particulars | Quarter Ended 31st March 2019 (Audited) | Year to date ended 31st March 2019 (Audited) | Corrosponding 3 months ended 31st March 2018 (Audited) | Corrosponding year ended on 31st march 2018 (Audited) |
|---|---|---|---|---|
| Total income from operations | 158.47 | 589.49 | 835.08 | 3179.47 |
| Net Profit / (Loss) (before tax and/or extraordinary items) | 13.69 | 41.67 | -194.67 | 106.74 |
| Net Profit / (Loss) for the period before tax (after Extraordinary items) | 13.69 | 41.67 | -194.67 | 106.74 |
| Net Profit/ (Loss) after tax (after extraordinary items) | 13.69 | 41.67 | -194.67 | 106.74 |
| Total Comprehensive income for the period [comprising profit/(loss) for the period (after tax) and other comprehensive income (after tax) ] | 74.69 | 400.90 | -425.35 | 506.10 |
| Equity Share Capital | 487.14 | 487.14 | 487.14 | 487.14 |
| Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) | 0 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| Earnings Per Share (of 10/- each) (for continuing and discontinued operations) | | | 0.00 | 0.00 |
| Basic: | 0.28 | 0.75 | -4.00 | 1.83 |
| Diluted: | 0.28 | 0.75 | -4.00 | 1.83 |

**Note:** The above is an extract of the detailed format of Quarter and half year ended Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarter and year ended Financial Results are available on the Stock Exchange website (www.bseindia.com) and also on the Company's website (www.dcl.net.in)

For Dhanlaxmi Cotex Limited
Sd/-
Ramautar S. Jhawar
Managing Director

Place : Mumbai.
Date: 29-05-2019

# शेकाप-काँग्रेस कार्यकर्ते कामाच्या ठेक्यावरून भिडले

■ शेकापचे दशरथ पाटील गंभीर जखमी

■ **प्रतिनिधी**
रायगड

लोकसभेच्या निवडणुकीत हातात हात घालून काम करणारे शेकाप आणि काँग्रेसचे कार्यकर्ते निवडणुकीनंतर एकमेकांसमोर भिडले. तालुक्यातील सारळ दत्तपाडा येथे कामाच्या ठेक्यावरून शेकाप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. यात दोन्ही गटातील दोघे जखमी झाले. यातील शेकापचे कार्यकर्ते दशरथ पाटील हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर अलिबागच्या जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी परस्परविरोधी गुन्हे दाखल झाले आहेत. कामाच्या ठेक्यावरून शेकाप-काँग्रेस कार्यकर्ते भिडले सारळ दत्तपाडा येथे डोंगरावर मुंबईतील बांधकाम व्यावसायिकाचे बंगलो स्कीमचे काम सुरू आहे. या कामावरून शेकाप आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद आहे. काँग्रेसचे कार्यकर्ते राजेंद्र ठाकूर, सारळचे सरपंच अमित नाईक तसेच शेकापचे दशरथ पाटील यांच्यात सोमवारी जोरदार वादावादी झाली. त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. यात लोखंडी सळ्या, काठ्यांचा सर्रास वापर करण्यात आला. यामध्ये शेकापचे दशरथ पाटील हे गंभीररित्या जखमी झाले.

# धडक माथाडी जनरल कामगार युनियनपदी नियुक्त्या

■ **प्रतिनिधी**
मुंबई


(छाया : अमोल राणे)

धडक माथाडी जनरल कामगार युनियनचे संस्थापक महासचिव, विख्यात कामगार नेते अभिजीत राणे यांच्या मुख्य उपस्थितीत सचिन सखाराम यादवडे यांची धडक माथाडी जनरल कामगार युनियनच्या ठाणे जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ति करण्यात आली.

धडक माथाडी जनरल कामगार युनियनतर्फे सचिन सखाराम यादवडे यांना उज्वल वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

आपल्याला पद देऊन सन्मान केल्याबद्दल सचिन सखाराम यादवडे यांनी विख्यात कामगार नेते अभिजीत राणे यांचे आभार मानले.

सदर प्रसंगी धडक माथाडी जनरल कामगार युनियनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व भाजप कोकण नेते अतुल रावराणे, जगदिश कुडेकर, शरद पाटिल, रोहण मोरे, रविंद्र सकपाळ, बंटी वर्मा, जयेश थोरात, केतन पाटिल, बाबा, शुभम दिक्षित, कांतिलाल राठोड, विशाल राठोड, पप्या केणी, विकी वाळुंजकर, कार्तिक, तुपार थोरात, शैलेष जाधव, संदिप पाटिल, मयुर गोसावी, पवन, सुनिल जयपातकर, विकास वाणी, अनुराग गावणकर, रोहित साळुंखे, अंकित मिश्रा, अक्षय लाडाणे, सतिश धामणे, आकाश चव्हाण, अल्पेश जाधव, गौरव पाटिल, दिपेश साटम, सुहास पठारे, प्रविण भोसले, अमित जोशी, विशाल लंके, नवनाथ कांबळे व धडक माथाडी जनरल कामगार युनियनचे अन्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# गुप्तरोग : माहिती आणि मुक्तता

**यौन जिज्ञासा**
**डॉ. ए. कुमार**

**☞ • डॉक्टर साहेब, आज आपल्या समाजात गुप्तरोगाचे परिणाम का वाढले आहेत?**

आज पश्चिमात्य देशांच्या चालीरितींचा आपल्यावर इतका प्रभाव पडत आहे की, आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीचा, नैतिक मूल्यांचा, सभ्यतेचा सर्वांना विसर पडत आहे. आजचे मोकळे वातावरण, नव्या नव्या फॅशन्स, त्याबद्दलचे विचार आणि वेगवान जीवनाने पब आणि कूब या संस्कृतीचा स्वीकार केलेला आहे. वर्तमानपत्र, दूरदर्शन, चित्रपट इत्यादी माध्यमातून प्रदर्शित होणाऱ्या कार्यक्रमांतून कामजीवनाचे प्रदर्शन होते आणि त्याचा लहान मुलांच्या मनावरही वाईट परीणाम होतो. अशा उत्तेजीत वातावरणात आजची तरुण पिढी नकळत अप्राकृतिक कामजीवनाकडे वळते. हस्तमैथून, गुदामैथून, मुखमैथून, पशुमैथून आणि समलिंगी मैथून अशा अप्राकृतिक मार्गाने आपली कामवासना पूर्ण करते.

अशा तऱ्हेने कामवासना पूर्ण झाली नाही तर वेश्यागमन केले जाते आणि गुप्तरोगाच्या विळख्यात सापडतात. इतकेच नव्हे तर विवाहित पुरुष कधी कधी समारंभ-सोहळ्यात प्रमाणापेक्षा जास्त दारु पितात आणि त्याच धुंदीत संयम विसरुन वेश्यागमन किंवा अपरिचीत स्त्रीशी संभोग करतात. अशातऱ्हेने ते या गुप्तरोगाच्या जाळ्यात अडकतात.

**☞ • 'गुप्तरोग' याचा अर्थ काय? आणि गुप्तरोग कशाला म्हणतात?**

गुप्तरोग म्हणजे संभोगजन्य रोग. त्यांना VD म्हणजे व्हेनेरियल डीसीज किंवा STD म्हणजे सेक्सुअली ट्रान्समिटेड डिसीज अर्थात यौन औपसर्गिक रोग असे म्हणतात. साध्या शब्दात, संभोगामुळे एकाकडून दुसऱ्याकडे पसरणाऱ्या रोगाला STD म्हणतात. असुरक्षित समागम अर्थात कंडोम न वापरता किंवा वापरताना कंडोम फाटण्यामुळे किंवा कंडोमच्या वरच्या भागातून इंद्रियातील पाणी दुसऱ्या इंद्रियापर्यंत गेल्याने हा गुप्तरोग होतो. उदाहरणार्थ सिफलिस, गनोरिया, हरपिस, एड्स इत्यादी.

**☞ •डॉक्टरसाहेब, सर्वसामान्य माणसाला स्वत:ला गुप्तरोग झाला आहे का हे कसे कळेल? गुप्तरोगाची काही खास लक्षणे आहेत कां?**

साधारणत: असुरक्षित संभोग झाल्यानंतर 6 महिन्यांत जर इंद्रियाला खाज येत राहिली, त्यावर फोड किंवा पुटकुळ्या आल्या, किंवा आग होऊ लागली, त्वचा लाल झाली, फोडांतून पू येऊ लागला किंवा फार दुखायला लागले तर ओळखावे की त्याला गुप्तरोग झाला आहे.

**☞ • आपल्या समाजात साधारणत: कोणत्या प्रकारचे गुप्तरोग झालेले आढळतात?**

गुप्तरोगाचे अनेक प्रकार आहेत पण साधारणत: पुढील रोग झालेल्या रोग्यांची संख्या जास्त आहे. हरपिस, गनोरिया, सिफीलीस ह्या तीन रोगांचे कण सर्वात जास्त असतात. त्याशिवाय क्रोमायडिया, व्हिनरल वॉर्टस्, कोंडाईलोमा, योनीदाह, एड्स आणि इतर काही गुप्तरोग होतात.

**☞ •हरपिस कशाला म्हणतात? त्याची लक्षणे कोणती?**

हा रोग झालेल्या रोग्यांच्या गुप्तांगावर किंवा इंद्रियावर व त्याच्या आजुबाजुला अगदी छोटे राईच्या दाण्याइतके छोटे, पाण्याने भरलेले फोड येतात एकाच जागी किंवा निरनिराळ्या ठिकाणी गुच्छाच्या स्वरुपात हे फोड येतात. हे फोड काहीवेळा औषधे घेऊन किंवा काही वेळेला 4,5 दिवसात औषधाशिवाय नाहीसे होतात. काहीवेळा पुन्हा 15 दिवसांच्या अंतराने पुन्हा फोड येतात. हरपिसचे फोड आल्यावर 3-4 दिवस ते रहातात आणि आपोआप फुटतात. काहीवेळेला त्यावेळी फार जळजळ होते आणि पाणी निघून जाते. दुसऱ्या ठिकाणी हे पाणी लागून तेथे हा हरपिस रोग होतो. फोडफुटल्यावर तेथे खुणा राहातात. त्या आपोआप जातात. साधारणत: फोड येण्यापूर्वी दोन दिवस इंद्रियाची जळजळ होते आणि खाज येते.

कधी कधी अधिक दारु पिण्याने, मांस-मच्छी खाण्याने, अतितिखट पदार्थ खाल्ल्याने, आगीच्या जवळ, उष्ण जागी काम केल्याने हे दुखणे लवकर होते. कोणत्याही प्रकारचा मानसिक ताण-तणाव, धक्कादायक घटना, ताप, न्युमोनिया अशक्तपणा आल्याने हरपिस हा पुन्हा पुन्हा होतो. त्यामुळे हरपिसच्या पुटकुळ्या आल्यावर संभोग करु नये. नाहीतर साथीदाराला हा रोग होऊ शकतो.

हरपिस हा व्हायरल गुप्तरोग आहे. त्वचेवर द्राक्षांसारख्या गुच्छाच्या रुपात आलेला, सूज आल्यासारख्या दिसणाऱ्या पुटकुळयांना हरपिस म्हणतात. ह्या रोगाचा प्रसार फार झपाट्याने होतो. म्हणून आयुर्वेदात ह्याला **"विसर्प"** असे म्हणतात. सर्व सामान्य लोक याला **"नागीण"** असे म्हणतात. ही शरीरावर कोठे ही होऊ शकते. पण बहुदा ओठ, कान, मानेचा मागचा भाग, पाठ किंवा गुप्तांग येथे होऊ शकते. हरपिसचे दोन प्रकार आहेत 1) हरपिस सिम्प्लेक्स 2) हरपिर झोस्टर.

**☞ •हरपिस हा रोग बरा होत नाही अस म्हणतात हे खरे आहे कां?**

आधुनिक चिकित्साशास्त्रात हे व्हायरस चे दुखणे असल्याने त्यावर काही खास चिकित्सा नाहीत. केवल लक्षणांनुसार औषधे दिली जातात. जसे वेदना कमी कमी करण्यासाठी वेदनाहारक गोळ्या देतात किंवा त्वचेवर लावण्यासाठी लेप दिले जातात. कधी कधी अँन्टीव्हायरल गोळ्या सुद्धा दिल्या जातात. परंतु औषधे देऊन सुद्धा हे दुखणे जितके दिवस रहाणार असते तितके दिवस रहातेच. पण आयुर्वेदात ह्याचे विस्तृत वर्णन केले आहे. आयुर्वेदात रक्तातील दोप तसेच पित्तदोष वाढल्यामुळे हे दुखणे येते असे नमूद केले आहे. त्यामुळे रक्तमोक्षण तथा पंच पंचकर्मादि चिकित्सा घेऊन शरीर शुद्ध केले जाते. त्याशिवाय चंद्रकला रस, भूनिम्बादी काढा, दुर्वादीघृत इत्यादी रक्त शुद्ध करणारी आणि पित्तदोष कमी करणारी औषधे दिली जातात. गायीचे दूध, गायीच्या दूधाचे तूप, द्राक्ष, अंजीर, मुग, मसूर, आवळा, इत्यादी पदार्थ आहारात आणल्याने लाभदायक होते.

अधिक मानसिक ताणतणाव किंवा उन्हाचा आणि उष्णतेचा संपर्क झाला तर खारट, आंबट व तिखट पदार्थ खाल्ले तर, अंडी, दारु, सिगारेट, मांसमच्छी इत्यादी पदार्थांचे खाण्यातील प्रमाण कमी करावे. अशा तऱ्हेने उपचार केल्यास फायदा होतो.

**☞ •डॉक्टरसाहेब, गोनोरिया, आणि सिफीलिस विषयी काही माहिती द्यावी.**

गोनोरिया याला आयुर्वेदात पूयमेह असे म्हणतात. या रोगात इंद्रियातून पू म्हणजे दुधासारखा पातळ किंवा जाड पांढरा स्त्राव निघतो. लघवीच्या वेळी फारच जळजळ होते आणि वेदना होतात. काहीवेळा तापही येतो. स्त्रियाच्या बाबतीत कळ येऊन अस्वाभाविक योनी स्त्राव सुद्धा होतो.

6सफलिस फिरंगी लोकांमार्फत हा रोग भारतात आल्यामुळे याला फिरंग असेही म्हणतात. सर्व सामान्य याला गर्मी असे म्हणतात. सर्व प्रकारच्या गुप्तरोगांत हा अतिशय धोकादायक रोग आहे. यात संभोगानंतर सर्वप्रथम एक वेदना नसणारा फोड होतो. नंतर थोडासा ताप येतो आणि 5-7 दिवसात सर्व ठीक होते. ही रोगाची पहिली स्थिती आहे. जर याचवेळी औषधोपचार केला नाहीतर रोगाची दुसरी-तिसरी आणि चौथ्या स्थितीपर्यंत पाळी येते. अंतीम अवस्थेत हातपाय, डोळे, नाक, वाकडेतिकडे होतात. डोक्यावरचे केस जाणे, डोके दुखी निर्माण होणे. अशी लक्षणे दिसतात.

**☞ गुप्तरोगापासून कशी मुक्ती मिळू शकते?**

आपल्या कामजीवनात खालील गोष्टी निश्चयाने पाळल्या ती बंधने पाळली तरी गुप्तरोगापासून बचाव होऊ शकतो- मुक्ती मिळू शकते.

1) नेहमी एकाच व्यक्तिशी समागम करा. इतरांशी समागम करु नका.
2) समागम करताना एक किंवा दोन कंडोम अवश्य वापरा.
3) प्रत्येक समागम क्रियेनंतर गुप्तांगाची व्यवस्थित स्वच्छता करा. तसेच समलिंगी संभोग, मैथून, पशुमैथून, गुदामैथून, मुखमैथून अशातऱ्हेचे अप्राकृतिक संभोग करु नका.

**☞ •गुप्तरोग पूर्णपणे बरा होतो कां?**

होय, साधारणत: 'एड्स' व्यतिरिक्त सर्व गुप्तरोग पूर्णपणे बरे होतात. पण त्या रोगांवर ताबडतोब औषधोपचार करायला हवेत परंतु लाज, शरम बाळगून हे रोग लपविले जातात आणि मग ते रोग वाढतात. त्यामुळे गुप्तरोगाबद्दल मनात शंका येताच ताबडतोब गुप्तरोगतज्ञाकडे जाऊन औषधोपचार करा. डॉक्टरांच्या योग्य मार्गदर्शनामुळे रोग बरा होतो.

**कायाकल्प इंटरनैशनल**
**सैक्स एण्ड हैल्थ क्लिनिक्स, मुंबई**
✆ 24213000 / 24217000
**बोरीवली ( पश्चिम ) :** 110 C. लेन्सीलोट, एस.व्ही रोड, शास्त्रीनगर एवं कल्याण ज्वेलर्स के सामने, मुंबई-92.( मंगलवार दोपहर 1 से 7 )
**दादर ( पश्चिम ) :** 2 माला, घामट टेरेस, हॉटेल शगुन के ऊपर, सेनापती बापट मार्ग, स्टेशन के सामने, मुंबई - 28. ( बुध, गुरू, शुक्र एवं शनि दोपहर 1 से 7 )
( रविवार एवं सोमवार दोनो क्लिनिक्स बंद )
www.kayakalpinternational.com
www.drakumar.com

**KD LEISURES LIMITED**
(Formerly known as Vishvesham Investments & Trading Limited)
Reg. Off.: B-702, 7th Floor, Neelkanth Business Park, Kirol Village, Near Bus Depot, Vidyavihar (West), Mumbai-400 086
CIN: L55100MH1981PLC272664 Website: www.kdgroup.co.in, Email id: roc.viatl@gmail.com
Statement Of Audited Standalone Financial Results
For The Quarter And Year Ended 31.03.2019 (Rs. in Crore)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 31.03.2019 (Audited) | Corre-sponding Quarter ended for previous year 31.03.2018 (Audited) | Year to date for the current year 31.03.2019 (Audited) | Year to date for the Previous year 31.03.2018 (Audited) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations (Net) | 1.139 | 0.091 | 1.674 | 1.406 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinaryitems) | 0.632 | 0.015 | 0.322 | 0.035 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 0.632 | 0.015 | 0.322 | 0.035 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 0.590 | 0.010 | 0.226 | 0.025 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after Tax)] | 0.590 | 0.010 | 0.226 | 0.025 |
| 6 | Paid-up Equity share capital (Face value Rs. 10/- each) | 3.240 | 3.240 | 3.240 | 3.240 |
| 7 | Other Equity [Reserves (excluding Revaluation Reserves) | 0.317 | 0.011 | 0.317 | 0.011 |
| 8 | Earnings per share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) (a) Basic & (b) Diluted | 1.820 | 0.032 | 0698 | 0.076 |

**Notes:** The above is an extract of the detailed format of quarterly & year to date financial results filed with the stock exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly & year to date financial results are available on the Stock Exchange website (BSE) and the company's website (www.kdgroup.co.in).

For and on behalf of
KD LeisuresLimited
Sd/-
Ajay Kantilal Vora
Director (DIN: 06864950)

Date: 29.05.2019
Place: Mumbai

**Spaceage Products Limited**
Reg. Off.: Room No. B-702, Neelkanth Business Park, Near Vidyavihar Bus Depot, Vidyavihar(West) Mumbai, Mumbai City MH 400086 IN
Website: www.spaceageproducts.co.in, Email id: roc.spaceage@gmail.com CIN: L34300MH1980PLC267131
STATEMENT OF AUDITED STANDALONE FINANCIAL RESULTS
FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31.03.2019 (Rs. in Crore)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 31.03.2019 (Audited) | Correspond-ing Quarter ended for previous year 31.03.2018 (Audited) | Year to date for the current year 31.03.2019 (Audited) | Year to date for the Previous year 31.03.2018 (Audited) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations (Net) | 0.015 | 0.065 | 0.089 | 0.315 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinaryitems) | (0.019) | 0.024 | 0.001 | 0.003 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (0.019) | 0.024 | 0.001 | 0.003 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (0.000) | 0.023 | 0.014 | 0.001 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after Tax)] | (0.000) | 0.023 | 0.014 | 0.001 |
| 6 | Paid-up Equity share capital (Face value Rs. 10/- each) | 3.124 | 3.124 | 3.124 | 3.124 |
| 7 | Other Equity [Reserves (excluding Revaluation Reserves) | 0.031 | 0.018 | 0.031 | 0.018 |
| 8 | Earnings per share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) (a) Basic & (b) Diluted | (0.001) | 0.072 | 0.046 | 0.004 |

**Notes:** The above is an extract of the detailed format of quarterly & year to date financial results filed with the stock exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly & year to date financial results are available on the Stock Exchange website (BSE) and the company's website (www.spaceageproducts.co.in).

For and on behalf of
Spaceage ProductsLimited
Sd/-
Bhavesh PrabhudasVora
Director (DIN: 06814823)

Date : 29.05.2019
Place: Mumbai

## चिमुकल्या बहीण व भावाचा जागीच मृत्यू

■ **प्रतिनिधी**
रायगड

कर्जत शहरामध्ये गवंडी गल्ली येथे रात्री घराच्या गच्चीवर खेळत असताना दोन चिमुकल्यांना विजेचा धक्का लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. आर्यन विनय कुमार निषाद (वय ७) आणि जान्हवी विनय कुमार निषाद (वय ३), अशी या बहीण भावांची नावे आहेत.मूळचे उत्तर प्रदेशमधील असलेले विनय कुमार निषाद हे घराला रंग देण्याचे काम करतात. रोज मोलमजुरी करून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवतात. नेहमीप्रमाणे विनय कुमार हे कामावर गेले होते. घरांमध्ये त्यांची पत्नी व दोन मुले होती. संध्याकाळी मुलांची आई घरामध्ये स्वयंपाकाचे काम करत असताना ही मुले घराच्या गच्चीवर खेळत असताना अनवधानाने विजेचा प्रवाह असणारी वायर त्यांच्या हातामध्ये आली. अन् क्षणात त्यांना विजेचा जोरदार धक्का बसला. या जोरदार धक्क्याने दोघेही शेजारील घराच्या पत्र्यावर उडाले आणि गतप्राण झाले.

## मनसेने केली मालमत्ता कर पावत्यांची होळी

■ **प्रतिनिधी**
उल्हासनगर

उल्हासनगर मध्ये घन कचरा व्यवस्थापन पूर्णपणे अपयशी ठरले आहे. ओला सुका कचऱ्याचे वर्गीकरण होत नाही, कचऱ्यावर प्रक्रिया नाही डंपिंगची समस्या आहे याला जबाबदार असणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्या ऐवजी सर्वसामान्य नागरिकांना केलेली भरमसाठ मालमत्ता कर वाढच्या निषेधार्थ मनसेच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी मुख्यालयासमोर मालमत्ता कराच्या पावत्यांची होळी केली. यावेळी प्रशासनाच्या विरुद्ध जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

हार्दिक शुभेच्छा : धडक स्कुल वॅन ओनर्स असोसिएशन ● धडक ऑटो रिक्षा, टॅक्सी चालक-मालक युनियन